# महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे-०१

## प्रसिध्दीपत्रक

### शासकीय संगणक टायपिंग प्रमाणपत्र परीक्षा (GCC-TBC) जानेवारी - २०१९ निकाल

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत शासकीय संगणक टायपिंग प्रमाणपत्र परीक्षा (GCC-TBC) जानेवारी - २०१९ मध्ये इंग्रजी ३० व ४० श.प्र.मि या विषयाची दिनांक ०५/०१/२०१९ ते ११/०१/२०१९ या कालावधीत आणि मराठी व हिंदी ३० व ४० श.प्र.मि.या विषयाची दिनांक १८/०१/२०१९ ते २३/०१/२०१९ या कालावधीत ऑनलाईन पध्दतीने घेण्यात आली होती. सदर परीक्षेचा निकाल दिनांक १५/०३/२०१८ रोजी ऑनलाईन पध्दतीने जाहीर करण्यात येत आहे. या परीक्षेचा निकाल विद्यार्थ्यांना परिषदेच्या www.mscepune.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. विद्यार्थ्यांना गुणपत्रकांची ऑनलाईन प्रिंट घेता येईल.

विद्यार्थ्यांची मूळ प्रमाणपत्रे/ गुणपत्रके व निकालाच्या प्रती सर्व जिल्हयांचे शिक्षणाधिकारी, (माध्यमिक) जिल्हा परिषद (सर्व)व मुंबईसाठी विभागीय शिक्षण उपसंचालक, मुंबई विभाग, बालभवन, चर्नी रोड, मुंबई यांचे कार्यालयामार्फत संबंधित संगणक टंकलेखन संस्थांना वितरीत करण्यात येतील. विद्यार्थ्यांना त्यांची प्रमाणपत्रे/गुणपत्रके यथावकाश संगणक टंकलेखन संस्थामधून कार्यालयीन वेळेत मिळतील.

निकाल जाहीर झालेल्या दिनांकापासून १० दिवसांत परीक्षार्थीने गुणपडताळणी व उत्तरपत्रिकेच्या छायांकित प्रतीसाठी संस्थेतून विहित नमुन्यात ऑनलाईन अर्ज करणे आवश्यक आहे. गुणपडताळणीसाठी प्रति विषय रु. १००/- व उत्तरपत्रिका छायाप्रती मिळण्यासाठी प्रति विषय रु.४००/- ऑनलाईन पध्दतीने बँक ऑफ इंडियाच्या(BOI) खाते क्र. **050010210000035 IFSC code- BKID0000500** वर संस्था login व्दारे दिनांक २४/०३/२०१८ पर्यंत भरावेत. याबाबतच्या सविस्तर सूचना परिषदेच्या www.mscepune.in या संकेतस्थळावर देण्यात आल्या आहेत.

#### निकालाची संक्षिप्त माहिती (३० श.प्र.मि.)

| परीक्षेचे नांव | परीक्षेस प्रविष्ठ विद्यार्थी | उपस्थित | अनुपस्थित | उत्तीर्ण | अनुत्तीर्ण | राखीव | शेकडा निकाल (उपस्थिती अनुसरुन) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| मराठी ३०श.प्र.मि<br>हिंदी ३० श.प्र.मि | ५५२९८ | ४५४७९ | ९७८३ | २६२७१ | १९२०८ | ३६ | ५७.७६% |
| इंग्रजी ३० श.प्र.मि | ८९५५९ | ७७०१७ | १२४४५ | ४६२८९ | ३०७२८ | ९७ | ६०.१०% |
| एकूण | १४४८५७ | १२२४९६ | २२२२८ | ७२५६० | ४९९३६ | १३३ | ५९.२३% |

#### निकालाची संक्षिप्त माहिती ( ४० श.प्र.मि.)

| परीक्षेचे नांव | परीक्षेस प्रविष्ठ विद्यार्थी | उपस्थित | अनुपस्थित | उत्तीर्ण | अनुत्तीर्ण | राखीव | शेकडा निकाल (उपस्थिती अनुसरुन) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| मराठी ४०श.प्र.मि<br>हिंदी ४० श.प्र.मि | ४२६९ | ३७३६ | ५३३ | १९९० | १७४६ | ० | ५३.२६% |
| इंग्रजी ४० श.प्र.मि | ४३९१६ | ३८७३२ | ५१०७ | १८१०८ | २०६२४ | ७७ | ४६.७५% |
| एकूण | ४८१८५ | ४२४६८ | ५६४० | २००९८ | २२३७० | ७७ | ४७.३२% |

(तुकाराम सुपे)

आयुक्त,

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे -१